# <u>दोषारोपपूर्वीचा पुरावा</u>

नि.फौ.ख. क्र. १०४/२०२२
प्रियांका विरुध्द रविंद्र व इतर
नि.क्र.२५

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – प्रियांका संजय वाईकर ,
वय – ४३ वर्षे, कामधंदा – शेती,
राहणार –मेणवली, ता. वाई.

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास शपथेवर सुरु**
**फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.आर.सणस –**

आरोपी क्र.१ व २ हे माझे मोठे दिर असुन आरोपी क्र.३ जाउ आहे. आरोपी क्र.४ हा आरोपी क्र.१ व २ यांचा भाचा आहे. सर्व आरोपी मेणवली गावातील रहिवाशी आहेत. आरोपी व माझ्यात कोणतेही दिवाणी स्वरुपाचे वाद नसुन आमच्यात शेती वाटपावरुन कुठलाही दावा प्रलंबीत नाही. मेणवली येथील गट क्र.४९३ या मिळकतीत माझे सासरे शिवाजी भिकू वाईकर तसेच त्यांचे भाउ शामराव भिकू वाईकर व नरहरी भिकू वाईकर यांचे सामाईक क्षेत्र आहे. सर्वजण आपापल्या क्षेत्रात वहिवाट करतात व तशी नोंद सात बारा उता–यात आहे. दि.२०.०६.२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजताचे सुमारास गट क्र.४९३ मधील आमच्या माळ नावाच्या शिवारात आमच्या क्षेत्रात मी काम करीत असताना आरोपी क्र.१ व ३ तेथे आले. ते मला पाटातील गवत काढु नको असे म्हणुन शिवीगाळ व धमकी देवु लागले. आरोपी क्र.१याने माझा हात पिरगळला. तसेच त्याने आरोपी क्र.३ सह मिळुन मला पाठीवर, पोटावर लाथांनी मारहाण केली. सदरील घटनेच्यावेळी मी एकटीच आमच्या शेतात होते. त्यावेळी माझे पती घरी होते. मी त्यांना फोन करुन घटनास्थळी बोलावुन घेतले. त्यांनी भांडण सोडविले. त्यावेळी आरोपींनी त्यांना देखील शिवीगाळ केली होती. सदरील घटनेची फिर्याद मी पोलीस ठाणे वाई येथे दिली होती. तथापी केवळ अदखलपात्र गुन्हयाची नोंद करुन आरोपीवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तत्पूर्वी देखील दि.१९.४.२०२२ रोजी मी व माझे पती आमच्या शेतातील क्षेत्रात विठ्ठल सदाशिव चौधरी यांच्या टॅक्टरद्वारे नांगरणी करीत असताना आरोपी क्र.१ व ४ तेथे आले. त्यांनी त्यावेळी मला व माझ्या पतीला शिवीगाळ केली. तसेच ट्रॅक्टर

चालक विठ्ठल चौधरी यास ट्रॅक्टरवर चढुन मारहाण केली  त्याबाबत देखील पोलीसात फिर्याद देण्यात आली होती परंतु कोणतीही कार्यवाही न करता केवळी अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला होता.

२.		आता मला मुळ फिर्याद नि.क्र.१ दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. तसेच अदखलपात्र गुन्हा क्र.६४६/२०२२ च्या मुळ प्रतीवर माझी सही असुन संबंधीत पोलीस अधिकारी यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ती मुळ प्रत **नि.क्र.२६** वर आहे. माझ्या आधारकार्डची पडताळीत प्रत **नि.क्र.२७** वर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे दोषारोपनिश्चितीपर्यंत राखुन ठेवला.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत
स्वाक्षरी/-
(आर. एम. भेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई

दिनांक :- ०५/१०/२०२३